D:\APA 2024\Letter 2024.doc

# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ


कृषि नगर, वसमत रोड, परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| | | | |
|---|---|---|---|
| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
| वेबसाईट | : www.vnmkv.nic.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५, २२३५८२ |


वाचा : वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.४६/सेवा-४ दिनांक २ फेब्रुवारी २०२४

दि.१.११.२००५पुर्वी पदभरती जाहिरातीच्या अनुषंगाने विद्यापीठ सेवेत दि.१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या अधिकारी /कर्मचा-यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करणेबाबत.

## विद्यापीठ परिपत्रक

क्र.२०२४/प्र.क्र.१२९८/जुनी पेन्शन/आस्था-१/ 2073

दिनांक : १२ एप्रील २०२४

**परिपत्रक :**

संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णयान्वये दि.१.११.२००५ पुर्वी पदभरती जाहिरात निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि.१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन नियम १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण नियम १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगीक नियमाच्या तरतूदी लागू करण्यात आलेल्या आहेत.

सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने दि.१.११.२००५ पुर्वी निर्गमीत झालेल्या जाहिरातीनूसार विद्यापीठ सेवेत दि.१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या विद्यापीठ कर्मचा-यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत विनंती अर्ज प्राप्त होत आहेत.

त्या अनुषंगाने विद्यापीठातील सर्व अधिकारी / कर्मचा-यांना सुचित करण्यात येते की, ज्या अधिकारी / कर्मचा-यांनी दि.१.११.२००५ पुर्वी प्रसिध्द जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज केले असतील त्यांनी विद्यापीठाची जाहिरात व त्या अनुषंगाने सादर केलेल्या अर्जाची प्रत व इतर अनुषंगीक कागदपत्रे सादर करून जुन्या निवृत्ती वेतन योजनेचा लाभ मागणीचा अर्ज **दिनांक २५ एप्रील २०२४ पुर्वी** योग्य माध्यमाद्वारे या कार्यालयास सादर करावा. विहित मुदतीत अर्ज सादर न केल्यास अथवा अपुर्ण अर्ज सादर केल्यामुळे जुनी निवृत्ती वेतन योजनेसाठी विचार न झाल्यास त्यास आपण सर्वस्वी जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

मा.कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने.

(पु.को.काळे)
कुलसचिव

प्रत :

१. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता कृषि / संचालक संशोधन / संचालक विस्तार शिक्षण यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व कार्यालयाच्या निर्दशनास आणून द्यावे.
२. नियंत्रक वनामकृवि, परभणी.
३. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, परभणी यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
४. मा.कुलगुरू यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.
५. आस्थापना-२ / ३ / ४ / ६ कुलसचिव कार्यालय यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.